**M.I.D.C Police Station, Jalgaon,**
Dist.Jalgaon, Maharashtra
एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन, जळगांव ता.जि.जळगांव महाराष्ट्र
Ph. No.02557- 2210500. Email ID- pstn.midc@gmail.com.

-- प्रेस नोट --

दिनांक.१८/११/२०२५

**प्रति,**

मा.संपादक

-----------------------------

**विषय - बंद घरात घरफोडी करुन ऐवज चोरी करणारे गुन्हेगार एमाआयडीसी पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाच्या ताब्यात.**

----ooo----

जळगाव शहरातील लक्ष्मी नगर भागात राहणारे फिर्यादी राजेंद्र दुसाने हे परिवारासह सुमारे दोन महिन्यापासुन पुणे येथे गेले होते. दि.१२/११/२०२५ रोजी त्यांच्या बंद घराचा दरवाजा उघडा असले बाबत शेजा-यांनी फोन करुन कळविल्याने ते जळगाव येथे पोहचुन घराची पाहणी केली असता त्यांच्या घरातील संसार उपयोगी वस्तु एलईडी टीव्ही, फ्रिज, कुलर, गॅस शेगडी, गॅस हंडी, तांबे पितळी भांडे व इतर वस्तु दिसुन न आल्याने घरात घरफोडी झाल्याचे खात्री झाल्याने एमाआयडीसी पोलीस स्टेशन गुरन ८२८/२०२५ भा.न्या.सं. २०२३ चे कलम ३०५(a), ३३१ (३)(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

एमआयडीसी पोलीस स्टेशन जळगाव चे पोनि बबन आव्हाड यांनी तात्काळ एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाचे पोउनि राहुल तायडे, पोउनि चंद्रकांत धनके, सफौ विजयसिंग पाटील, पोह गिरीश पाटील,पोह प्रदीप चौधरी, पोह गणेश शिरसाळे, पोह किशोर निकुंभ, पोह प्रमोद लांडवंजारी, पोह किरण चौधरी, पोकॉ शशिकांत मराटे, पोकॉ नरेंद्र मोरे अशांचे पथक नेमुन सदरचा घरफोडीचा गुन्हा उघड करणे कामी आवश्यक त्या सुचना दिल्या.

वर नमुद पथकातील अंमलदारांनी गोपनिय बातमी काढून सदर गुन्हा करणा-या आरोपीतांची ओळख पटवुन माहिती काढून सदर गुन्हा करणारे आरोपीतांना जळगाव शहरातील लक्ष्मी नगर भागात सापळा रचुन शिताफीने दि.१३/११/२०२५ रोजी ताब्यात घेवुन विश्वासात घेवुन विचारपुस करता त्याने त्यांचे नाव संदीप तुळशीराम शेवरे, रा लक्ष्मी नगर जळगाव असे सांगुन त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली देवुन त्याने सदरचा गुन्हा हा त्याचा साथीदार नामे राहुल सुपडू चौधरी व एक अल्पवयीन मुलासोबत मिळुन केला असले बाबत सांगितले व सदर गुन्हात चोरी केलेला एकुण ५२,०००/-रु किमतीचा मुद्देमाल एलईडी टीव्ही, फ्रिज, कुलर, गॅस शेगडी, गॅस हंडी, तांबे पितळी भांडे व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच दि.१४/११/२०२५ रोजी दुसरा आरोपी नामे राहुल सुपडू चौधरी रा. लक्ष्मी नगर जळगाव यास ताब्यात घेवुन गुन्हा करण्यासाठी वापरलेली रिक्षा देखील जप्त करण्यात आली आहे.

सदरची कारवाई डॉ.महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक जळगाव, मा.अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक जळगाव, मा.नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव भाग, पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेली आहे.

**पोलीस निरीक्षक**
**एमआयडीसी पो.स्टे.जळगाव**




vivo V40 | ZEISS

24mm f/1.88 1/307s ISO50
11/17/2025, 14:09